International Recognized Double-Blind Peer Reviewed Multidisciplinary Research Journal
**Review Of Research**
ISSN 2249-894X | Impact Factor : 3.1402 (UIF)
Volume - 4 | Issue -8 | May - 2015 | Available online at www.ror.isrj.org

# परिवर्तन करणारी कविता : 'आयुष्य नांगरतांना'

**गजानन जाधव**
मराठी विभाग , सिध्दार्थ कला, वाणिज्य व विज्ञान ,महाविद्यालय, जाफ्राबाद जि. जालना

Short Profile :
Gajanan Jadhav is working at Department of Marathi in Siddharth arts, commerce and science, college japhrabada Dist. Jalna.



***सारांश :***
'आयुष्य नांगरताना' हे हेमंतकुमार एकनाथ कांबळे यांचे प्रदीर्घ चिंतनकाव्य आहे. नांगर हा कृषिसंस्कृतीचा एक महत्तवाचा घटक. कष्ट, मशागत, सृजनपूर्व अवस्था सूचित करणारे आयुध याचा तो सूचक आहे. नांगरणी म्हणजे पेरणीच्या अगोदर केली जाणारी शेतीची मशागत होय. येथे कवी आपल्या संग्रहाला 'आयुष्य नांगरतान...' असे शीर्षक देतो. याचा अर्थ हा शेतकरी आयुष्यभर फक्त नांगरतो आहे, मशागत करतो आहे. जिवापाड काबाडकष्ट करतो आहे. त्यातून पुढे पिकतही असेल, पण या शेतकऱ्यांच्या नशिबी फक्त नांगरणे आहे. हे नांगरणे आता केवळ शेतीतले नांगरणे नाही, तर शेतकऱ्यांच्या वाट्याला येणाऱ्या आयुष्याचे नांगरणे आहे. फक्त नांगरणी म्हणजे कष्ट, हाल, अपेष्टा असे अपेक्षित आहे. पण नांगरणीतूनही आता नवे भान, नवी विचारधारा, नवा दृष्टिकोन शेतकरी आत्मसात करू शकतो आणि त्याच्या यशस्वी फलप्राप्तीसाठी तो संघर्षप्रवृत्तही होऊ शकतो, हा आशय या संग्रहाच्या शीर्षकातून ध्वनित झाल्याचे जाणवते.

**Article Indexed in :**
DOAJ Google Scholar DRJI
BASE EBSCO Open J-Gate

*प्रस्तावना*

शेतकऱ्यांची कैफियत मांडून त्यांच्या प्रश्नांना वाचा फोडणाऱ्या क्रांतिमानव ज्योतिबा फुले यांना हे पुस्तक अर्पण केले आहे. या पुस्तकातही एकविसाव्या शतकाच्या पहिल्या दशकातील शेतकऱ्यांच्या प्रश्नांची मांडणी केली आहे. त्यामुळे ही अर्पणपत्रिका अत्यंत उचित आणि अर्थपूर्ण आहे.

'नांगरणीपूर्वी' मध्ये हेमंतकुमार कांबळे यांनी या दीर्घकाव्याच्या निर्मितीविषयीची आपली भूमिका स्पष्ट केली आहे. "माझी (ही) दीर्घ कविता म्हणजे शेतकऱ्यांच्या जीवनातील प्रदीर्घ वेदना आहे व तीच मी आपल्या हवाली करीत आहे... शेतकऱ्याची भूतकालीन दुरवस्था, वर्तमानकालीन शोषण आणि भविष्यकाळात होऊ घातलेले मरण या दु:खत्रयीने मी अस्वस्थ झालो. या अस्वस्थतेचा प्रांजळ हुंकार म्हणजे ही कविता होय." ही दीर्घकविता म्हणजे शेतकऱ्यांचे आत्मनिवदेन आहे, आत्मभान आलेल्या शेतकऱ्याने साहेबाशी साधलेला हा संवाद आहे, त्या संवादातून तो आपल्या प्रश्नांची मांडणी करतो, समस्त शेतकऱ्याच्यावतीने त्याच्या दु:ख दारिद्र्याची, कष्ट-शोषणाची कैफियत सादर करतो.

"... मी कास्तकार
मी बळीराजा, मी कृषक
या देशातल्या समस्त गौरवाने
गौरवून स्वत:चे तोंड पुसून
खुंटीला टांगलेल्या
मळकट शेल्यागत मी शेतकरी.
साहेब, आज मी मुक्त करणार आहे
विटक्या आयुष्याच्या
जायबंदी श्वासाचा दग्धगळा
अन् उजागर करणार आहे
आमरण मृत्युचा सरणकळा" (आयुष्य नांगरताना, पृ. १६)

झोडपणारा धुवांधार पाऊस, कडाक्याच्या थंडीचा मार, चैत्रझळा सोसत शेतकरी शेतात राबतो. हिरव्या स्वप्नांना आशेचे अंकूर फुटावेत म्हणून तो धडपडतो. पण फुलत्या अंकुरावर निखारे पडल्यामुळे तोही स्वप्नांसह खाक होतो. पिढीजात आतबट्ट्याचा शेतीचा धंदा करणारा हा कास्तकार सहकुटुंब, सपत्निक कसा राबतो, ते कांबळे यांनी एका विलक्षण प्रसंगातून रेखाटले आहे.

"परंपरेच्या कर्जकड्यावर चढत
पेरणीची केली सोय
मृगाच्या बरसल्या धारा
अन टोबणीकरिता
बाहेर आली माझी
खाटलं धरलेली म्हातारी माय
बिलस्तभर पोरगंही
लागलं फुल्या धरून टोबायला
ओली बाळंतीण कमरेला शेव
अन हद्दपार झालं तिचं दुखण्याचं भेव?" (आयुष्य नांगरताना, पृ. २२)

अशाप्रकारे जणू संघर्ष हा शेतकऱ्यांच्या जीवनातला स्थायीभाव आहे. आजन्म कष्ट हा त्याचा जणू वसा असतो. हा कास्तकार म्हणजे वेदना, यातना. पण त्याचबरोबर त्याची उपेक्षा, आबाळ आणि हेळसांड होते. आता त्याला आपल्या व्यथा वेदनांचा अर्थ कळू लागला आहे, आपल्या वाट्याला येणाऱ्या हालअपेष्टांचा, काबाडकष्टांचा तो शोध घेऊ लागला आहे.

"कास्तकार म्हणजे निर्मितीच्या
प्रसूतीकळेची धगधगती आग,
ज्यावर सारेच शेकतात
आपापल्या स्वार्थाची पोळी
सर्वांची साजरी होते दिवाळी
कोणी आरंभिली रे
आमच्या जिंदगीची
ही अखंड होळी ?
कुणी आणली असेल रे
आमच्यावर ही विकराल पाळी ? " (आयुष्य नांगरताना, पृ. २४)

शेतकऱ्यांवर कोसळणारी संकटांची मालिका ही त्याचे जगणे जीवघेणे बनविते. पावसाच्या मनमानीने तर त्याच्यावर दुबार पेरणीचे संकट कोसळते. केवळ पेरणीपाण्यापुरतेच नव्हे तर शेतकऱ्यांचे दैनिक, वार्षिक, प्रापंचिक आणि एकूण संपूर्ण आयुष्यभराचे जीवन मरणप्राय आणि दु:खदायक असते. शेतकऱ्यांचे आयुष्य म्हणजे एक अमर ठणक असते. त्याचे संपूर्ण आयुष्य चवीने चघळण्यासाठी सर्वजण जणू टपलेले असतात.

"साहेब, किती कितीदा करावा
काळजीच्या कात्रीने काळजाचा खिमा ?
जिथं पेरणीच्या एका प्रश्नाने
होते जगणे एक राजा
तरी ऐकतो शिवी
शेतकरी म्हणे राजा
'बळीराजा एक अमर सजा!'
अपमानित करू नका रे
असल्या शिवीने
मृत्युही घालत नाही झडप धडकन.
एखाद्या मस्तवाल कुत्र्याने
चघळावी हड्डी
तसा मृत्यु चघळते कास्तकाराला
रोज नव्या चवीने" (आयुष्य नांगरताना, पृ. २६)

'आयुष्य नांगरताना' हे दीर्घकाव्य म्हणजे शेतकऱ्याच्या समग्र कष्टमय जीवनाला, त्याच्या दु:खमय वेदनांकित आयुष्याला कवीने घातलेली ही परिक्रमा आहे. या चिंतनशील दीर्घकाव्यातून शेतकऱ्यांच्या समग्र समस्यांची व्यवस्थित मांडणी केली आहे. व्यापारी, सत्ताधारी, सरकार, कारखानदार हे शेतकऱ्यांच्या शोषणावर सुखवस्तू आणि ऐतखाऊ जीवन जगतात. शेतकऱ्यांच्या एकूण जीवनाबद्दल ही समाजव्यवस्था मूल्यबधिर, संवेदनशून्य झाली आहे. त्याचा खरपूस समाचार कांबळे यांनी घेतला आहे.

"करडाला लुचावे कुत्र्याने
तसा लुचतो जीवाला व्यापाऱ्यांचा थवा
त्यांना वाटतच नाही भय नैतिकतेचे
राजकारणीही झाले सत्तेसाठी तृष्ण
अन संसदेच्या कोणत्याच अधिवेशनात
गाजत कसा नाही हा फसगतीचा प्रश्न ?
वेळ-वातावरण-पाणी
यावर अवलंबून म्हणे
औषधी बियाण्याच्या परिणामाचे तंत्र
कायद्यातून काढल्या पळवाटा

खताने काढला पळाटीचा काटा
लुटारू झाले स्वतंत्र
सरकार-व्यापारी-कारखानदार
साळतो हिंदुस्थानी नात्याने
अन् भरडतो मला
शोषणाच्या जात्याने" (आयुष्य नांगताना, पृ. ३८)

वास्तविक सुगी म्हणजे हंगाम किंवा समृध्दीचा कालावधी. सुगी-विषयी 'आली सुगी फुगले गाल; गुली सुगी मागचे हाल' असे म्हटले जाते. शेतकरी पेरणीच्या आधी आणि नंतर जे श्रम करतो त्याचे फलित म्हणजे सुगी. कधीकाळी सुगी हा शेतकऱ्याच्या दृष्टीने आनंदाचा, वैभवाचा काळ असे. पण आता शेतकऱ्याच्या पिकाची शाश्वती राहिली नाही. म्हणून सुगीची कवीने केलेली परिभाषाही पाहण्यासारखी आहे.

"चोरांनी नेऊन, पाखरांनी खाऊन
जनावरांच्या जबड्यातून
उरलेले पीक म्हणजे 'सुगी" (आयुष्य नांगरताना, पृ. ४२)

वास्तविक 'सुगी' ही त्याच्या दृष्टीने परमोच्च आनंदाचा काळ मानला जातो.

"सुगी म्हणजे
शेतकऱ्याच्या काताळलेल्या
आयुष्यावर उमलेले सुगंधी गुलाब
सुगी म्हणजे
उपासून मरगळलेल्या
पोटाला मिळालेला संजीवन घास
सुगी म्हणजे
वर्षभराच्या जायबंदीतून
मुक्ताळणारा दीर्घ श्वास"(आयुष्य नांगरताना, पृ. ४३)

'सुगी' या एका शब्दाने मृत झालेली कृषिमने जिवंत होतात. 'सुगी' मुळे घराघरातील थंड चुली फुलतात. 'सुगी' च्या डोळ्याने तो अत्तराचे प्रज्वलित दिवे पाहतो. 'सुगी' तूनच तो भेगाळलेल्या आयुष्यात भाकरीच्या स्वप्नांची आखणी

करतो. 'सुगी' मुळे आनंदाच्या पाखरांचे थवेच्या थवे उठतात. तिच्या चवदार भाकरीच्या घासाने म्हातारे-कोतारे उठून बसतात. तिच्यामुळे लाभणाऱ्या नव्या पिठाच्या वासाने घर हरखून जाते.

शेतकऱ्यांचे कष्ट, त्याचे दु:ख त्याचे होणारे शोषण, त्या शोषणाला कारणीभूत असणारी अर्थव्यवस्था, त्या अर्थव्यवस्थेला नियंत्रण करणारी शासनप्रणाली आणि या सर्वांच्या विरूध्द पेटून उठू पाहणारा आजचा शेतकरी, त्याचे आत्मभान, त्याच्या समस्यांची मांडणी, त्याचे प्रश्नोपनिषद हे या दीर्घकाव्याचे अंत:सूत्र आहे. कवीने त्याची तात्विक, व्यावहारिक आणि तपशिलात्मक मांडणी केली आहे. शेतकऱ्याचा खरा पिंड सृजन-पोषणाचा आहे. तो धरत्रीचे पोषक-धारकत्व महत्त्वाचे मानणारा आहे.

"... अरे जे जगाला पोसतात
ते पाहूच शकत नाही चिखल रक्ताचा
अन कोणताच कृषिपुत्र
होणार नाही रचियता
विनाशाच्या सूक्ताचा" (आयुष्य नांगरताना, पृ. ६१)

पण तरीही हा आधुनिक नवजागृत शेतकरी आता पूर्वीसारखा भोळाभाबडा राहिलेला नाही. त्याला स्वत:च्या अस्तित्त्वाची, अस्तितेची जाण होऊ लागली आहे. अशा नवजागृत शेतकऱ्यांचा प्रतिनिधी म्हणून कवी 'साहेबांना' उद्देशून आपली भूमिका मांडतो. तो एकूणच राजकीय-सामाजिक-आर्थिक व्यवस्थेचा प्रतिनिधी म्हणून 'साहेबा'ला उद्देशून आपली, कैफियत सादर करतो.

वास्तविक शेतकऱ्यांचे 'जीवनस्वप्न' हे प्राथमिक गरजाचे असते, घामाला योग्य तो दाम मिळण्याचे असते. शेतीतील मालाला वाजवी भाव लाभावा हे असते. पण बिचारा शेतकरी उपेक्षेचा टरफलाचा धनी असतो. सुखवस्तू, प्रस्थापित पांढरपेशे, सत्ताधारी त्याचे म्हणणे समजून घेत नाही आणि त्यामुळे त्याला योग्यतो न्याय मिळत नाही. म्हणून तो आर्त स्वरात आर्जव करतो-

"साहेब, या देशातल्या कष्टकऱ्याचे स्वप्न
जर वास्तवात उतरले
तर हा देश होईल जगाची महाशक्ती
पण इकडे कोणीच वळत नाही
तुमच्या टेरेलीन जगण्याला
या गोणपाटी जगण्याचे गणित कळतच नाही"

(आयुष्य नांगरताना, पृ. ५२)

भारत आणि इंडिया ही विभाजन रेषा शेतकरी आंदोलनाने १९८० ते १९९० च्या दशकात प्रभावीपणे मांडली होती. तिचे पडसाद नव्वद नंतरच्या अनेक कवितांतूनही उमटले आहेत. शेतकऱ्याच्या समस्या अनेक आहेत. त्याची विविधांगी, मांडणी हेमंत कांबळे सहजपणे करतात. मुलाचे शिक्षण, त्याची नोकरी आणि मुलीचे लग्न ही महत्त्वाची समस्या कवीने या दीर्घकाव्यात यथोचितपणे मांडली आहे. दुसरीकडे कवीने प्रस्थापित आणि कष्टकरी यांच्यातील दरी एक उदाहरण घेऊन अधोरेखित केली आहे.

"... जगातल्या कोणत्याच संसदेत
चालत नसेल इतकी श्रमिकांची थट्टा
साहेब, आमच्या बारमाही खर्चा इतका
तुमच्या कुत्र्याच्या गळ्यातला पट्टा."
(आयुष्य नांगरताना, पृ. ४६)

हा शेतकरी अनंत काळापासून पांडुरंगाच्या कर्जाच्या विटेवर उभा आहे. मोटारच्या पाण्याने त्याच्या कर्जाची वीट विरली पाहिजे; त्याशिवाय या त्याच्या विस्कटलेल्या आयुष्याची घडी पुन्हा नीट बसणे शक्य नाही. आपल्या काळजीचे 'कोलीत' कायमचे विझविण्यासाठी शेतात 'ओलीत' झाले पाहिजे, ही त्याची तळमळ आहे. कीटकनाशक औषधाने किडे निरोगी, निर्माते 'स्ट्राँग', विक्रेते 'मालामाल' आणि कास्तकार बेहाल होतात. देश स्वातंत्र्याचे अर्ध शतक ओलांडूनही कास्तकाराच्या खोपटात भीतीचा अंधार का सळसळतो? वातानुकूलित बंगल्यात साळसूद माईक शेतीचे तंत्र कसे सांगतो ? या देशातली कास्तकारी जात प्रस्थापितांनी बहिष्कृत का केली? असे प्रश्न कवीला सतावतात.

"हा देश तरी कृषिप्रधान कसा म्हणावा
जिथे शेतकरीच मरतात
कुत्र्याच्या मौतीने.
ना कुणा सोयर ना कुणा सुतक
या सोन्याच्या धूर उगाळणाऱ्या
देशाच्या भट्टीतले
जळते लाकूड म्हणजे कास्तकार" (पृ. ४८)

ही त्याने मांडलेली वस्तुस्थिती अत्यंत विदारक आहे. कारण त्यातून प्रकटणारे वास्तव दाहक आणि ज्वलंत आहे.

'आयुष्य नांगरताना' मध्ये हेमंत कांबळे यांनी शेतकऱ्यांची व्यथा-कथा कधी हकीकत-वर्णनाच्या पातळीवर मांडली आहे, तर कधी विवेचन-तत्त्व-प्रतिपादनाच्या स्तरावर व्यक्त केली आहे. उदाहरणार्थ, शेतकऱ्यांभोवती प्रश्नांचा गराडा पडला आहे. तो समस्यांच्या तावडीत सापडला आहे.

"प्रश्नांच्या वारूळातून
फुत्कारतात नाग
अन् डंख मारून करतात
जीवन विषात्क
उत्तराच्या बाऱ्या
म्हणत नाही सरकार
अन् प्रश्नांच्या झेंडुने
तडफडतो कास्तकार."
(आयुष्य नांगरताना, पृ. २४)

पाऊस, दुष्काळ, पेरणी, मशागत, बाजारभाव, कर्जबाजारीपणा, भ्रष्टाचार, शोषण, शेतकऱ्यांविषयी प्रचंड आनास्था इत्यादी अनेक बाबींची नोंद 'आयुष्य नांगरताना' मध्ये पाहायला मिळते. प्रस्तुत दीर्घ चिंतनकाव्य म्हणजे शेतकऱ्यांच्या सर्व समस्यांची तात्त्विक आकलनासह केलेली सूत्रबध्द मांडणी आहे. पण ती नीरस, रूक्ष, केवळ माहितीपर, निव्वळ हकीकतवजा नाही. प्रा. इंद्रजित भालेराव म्हणतात- त्याप्रमाणे ती उत्कट, लयबध्द आणि प्रत्ययकारी आहे. "कविता छंदमुक्त असूनही अत्यंत लयबध्द झाली आहे. कवीची जाणीव प्रगल्भ आहे, आशय समृध्द आहे, व्यासंग कमावलेला आहे. त्यामुळे पन्नास पानांच्या या कवितेत कुठेही कवीची पकड ढिली झाल्यासारखी वाटत नाही. कविला विषयाची नेमकी जाणीव आहे आणि त्याने ती तितक्याच नेमक्या शब्दांत मांडली आहे. एकूण कविता ओवीबध्द आहे. जिथे बियाण्याच्या प्रश्नाने मेंदूची उगवणशक्ती बेचिराख होते. खताच्या काळजीने काळजात काटा रूततो. प्रश्नांच्या झेंडुने कास्तकार तडफडतो तरी उत्तराच्या बाऱ्या सरकार म्हणत नाही. अशा कृषिप्रधान देशातल्या शेतकरी राजाची ही करूण कहाणी आहे. या धरणीतून जीवासाठी संजीवनी निर्माण करणारा कास्तकार जळी-स्थळी-काष्ठी-पाषाणी एक अमर ठणक होऊन या कवितेत ठणकत राहतो."

अशाप्रकारे 'आयुष्य नांगरताना' हे हेमंत कांबळे यांचे शेतकऱ्यांच्या जीवनसंघर्षाला पुरेपूर न्याय देणारे, प्रतिमा-प्रतिकांच्या साहाय्याने त्याची व्यथा-कथा उलगडून दाखवणारे उत्तम चिंतनात्मक दीर्घकाव्य आहे. त्यात काव्य आणि नाट्य, संबोधन आणि निवेदन, तत्त्व आणि तपशील, समस्या आणि उपाययोजना, वास्तव आणि दिशा यांचा उत्तम मेळ घातला आहे. प्रस्तावनाकार प्रा. विलास भवरे यांनी 'कृषिजीवनाचा चिंतनशील अविष्कार' या शब्दांत त्याची नोंद केली आहे.' या संदर्भात चंद्रकांत वानखडे यांचा अभिप्रायही आवर्जून लक्षात घ्यावा असाच आहे. "आयुष्य नांगरताना हे दीर्घकाव्य वाचत असतांना कविता अक्षरशः जाणिवेच्या जमिनीवरच खोलवर नांगर फिरवीत आहे, असे वाटून जाते. संवदेनशील माणसाचे ह्दय खोलवर नांगरण्याइतपत धारदार फाळ या कवितेचा आहे. "